# NABIRA MAHAVIDYALAYA, KATOL

अहवाल
२०१७-१८

# सांस्कृतिक मंडळ

दि. १६.०१.२०१८ ला 'वेगळा विदर्भ' या विषयावर वादविवाद स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेत एकंदर ०९ विद्यार्थ्यांनी भाग घेतला होता. या स्पर्धेचे परीक्षक डॉ. पी.व्ही. सलामे तसेच डॉ. आर.के. इंगोले यांनी जबाबदारी पार पाडली. प्रा. गाकरेंनी कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी परिश्रम घेतले. संचालन सांस्कृतिक मंडळाचे समन्वयक, डॉ. बी.पी. वालोंद्रे यांनी केले तर आभार प्रा. किनकर यांनी मानले.

दि. १७.०१.२०१८ ला जवाहरलाल नेहरु कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, वाडी येथे 'वेगळा विदर्भ' या विषयावर आंतर विद्यापीठीय स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत कु. दिक्षा गजभिये (बी.एससी.-२) तसेच कु. हर्षा मालोकर (बी.एससी.-३) यांनी भाग घेतला होता.

दि. १८.०१.२०१८ ला रांगोळी स्पर्धा आणि मेहंदी स्पर्धा आयोजित करण्यात आलेल्या होत्या. रांगोळी स्पर्धेत १० मुलींनी भाग घेतला होता तर मेहंदी स्पर्धे १४ मुलींनी भाग घेतला होता. या स्पर्धेच्या प्रमुख डॉ. टी.एस. खेडकर यांनी ही जबाबदारी पार पाडली.

दि ३०.०१.२०१८ ला अरविंद देशमुख महाविद्यालय, भारसिंगी येथे आंतर महाविद्यालयीन वादविवाद स्पर्धा 'लहान लहान राज्याची मागणी राष्ट्र विकासास पुरक आहे' या विषयावर आयोजित करण्यात आलेली होती. या स्पर्धेत कु. पुजा नारनवरे (बी.ए.-२) व कु. दिक्षा गजभिये (बी.एससी.-२) यांनी भाग घेतलेला होता. या स्पर्धेत कु. पुजा नारनवरे (बी.ए.-२) हीने प्रथम पारितोषिक प्राप्त केले. याच महाविद्यालयात दि. ३०.०१.२०१८ ला 'मतदान महत्त्व आणि गरज' या विषयावर स्वयंमस्फुर्त भाषण स्पर्धा आयोजित करण्यात आलेली होती. या स्पर्धेत कु. धनश्री धोटे (बी.एससी.-३) हीने भाग घेतलेला होता.

दि. १७.०२.२०१८ ला सांस्कृतिक मंडळाच्या वतीने नृत्य स्पर्धा तसेच गीत गायन स्पर्धा आयोजित करण्यात आलेली होती. नृत्य स्पर्धेचे प्रमुख डॉ. रुईकर तर गीत गायन स्पर्धेचे प्रमुख डॉ. तिवारी यांनी विशेष परिश्रम घेतले. नृत्य स्पर्धेत एकल नृत्य व समुह नृत्याचे सादरीकरण करण्यात आले. नृत्य स्पर्धेत २० तर गायन स्पर्धेत १६ स्पर्धक सहभागी झालेले होते. या कार्यक्रमाचे संचालन सांस्कृतिक मंडळाचे समन्वयक, डॉ. बी.पी. वालोंद्रे यांनी केले तर आभार विद्यापीठ प्रतिनिधी सागर आमटे यांनी मानले.

डॉ. बी.पी. वालोंद्रे
समन्वयक
सांस्कृतिक मंडळ





सांस्कृति मंडळाद्वारे आयोजीत रांगोळी आणि मेहंदी स्पर्धेत सहभागी विद्यार्थीनी




सांस्कृतिक मंडळाद्वारे आयोजित वादविवाद स्पर्धेत सहभागी विद्यार्थी


नबीरा महाविद्यालय, काटोल
सांस्कृतिक मंडळ
दि.17-2-2018




नबीरा महाविद्यालय, काटोल
सांस्कृतिक मंडळ
दि.17-2-2018